पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३० ■ बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -330 ■ Wednesday, 2 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून माजी खासदार राजू शेट्टी आक्रमक

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रात महायुतीचं सरकार सत्तेत येऊन जवळपास चार महिने झाले आहेत. मात्र, महायुतीच्या नेत्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्यापही होताना पाहायला मिळत नाही. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान म हायुतीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र, महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर ही घोषणा आता हवेतच विरल्याचं पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्यांना कर्जमाफीची आशा लागलेली असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी होईल की नाही? याबाबत स्पष्ट सांगितलं.शेतकऱ्यांनी आपआपले कर्ज भरण्याचे सूतोवाच अजित पवार यांनी केले. दरम्यान, यावरूनच आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी हे आक्रमक झाले आहेत. 'महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा मंत्रिमंडळातील मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही', असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. ते आज पत्रकार परिषदेत बोलत होते.



महायुतीने शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचं आश्वान दिलं. पण आता अजित पवारांनी सांगितलं कर्जाचे पैसे भरा. या क्षणाला अनेक शेतकरी थकबाकीदार आहेत. त्या शेतकऱ्यांना बँकांनी नोटीस काढल्या आहेत. यावरून राज्यातील शेतकऱ्यांची आवस्था काय आहे हे लक्षात येतं. खरं तर लोकांनी शेतकऱ्यांचं दुहेरी नुकसान केलं आहे.

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका देखील अडचणीत आलेल्या आहेत. आता कर्ज माफ झालं नाही म्हणून शेतकऱ्यांना एकीकडे जप्तीच्या नोटीसा येत आहेत, असं राजू शेट्टी यांनी म्हटलं आहे.

दुसरीकडे वेळेत कर्ज न भरल्याप्रकरणी व्याज सवलत मिळत नाही. तसेच त्या शेतकऱ्यांचा समावेश थकबाकीदारांमध्ये होतो. तसेच शेतकऱ्यांनी ते कर्ज भरलं नाही म्हणून पुन्हा कर्ज मिळणार नाही. अशा पद्धतीची शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. मात्र, आम्ही हे सहन करणार नाहीत. येत्या एका आठवड्यात राज्य सरकारने याबाबतची भूमिका जाहीर करावी. अन्यथा महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या तीनही पक्षाच्या मंत्र्यांना आम्ही राज्यात फिरू देणार नाहीङ्क, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.

**अजित पवार काय म्हणाले होते?** – राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार २८ मार्च रोजी एका कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार की नाही? याबाबत मोठं भाष्य केलं होतं. अजित पवार म्हणाले होते की, ङ्गमी सभागृहात उत्तर देताना देखील सांगितलं होतं की सगळी सोंगं करता येतात, पण पैशाचं सोंग करता येत नाही. मी महाराष्ट्रातील जनतेला स्पष्ट सांगतो. ३१ मार्चच्या आत आपआपले पीक कर्जाचे पैसे भरा, असं अजित पवार म्हणाले होते.

## सोलापूर : बैलांच्या अंघोळीसाठी तळ्यात गेलेल्या शेतकऱ्याचा बुडून मृत्यू; बैलाचाही अंत

सोलापूर : उन्हाळ्यात उष्णता शम विण्यासाठी आपल्या बैलांना अंघोळ घालण्यासाठी तळ्यात गेलेल्या एका शेतकऱ्याला पाण्यात बुडून स्वतःचा जीव गमवावा लागला. त्यांच्या बैलजोडीपैकी एका बैलाचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे येथे ही दुर्घटना घडली.

अंकुश काशीनाथ शिरसाट (वय ५५) असे दुर्दैवी मृत शेतकऱ्याचे नाव आहे. सध्या उन्हाळ्यात वाढत्या उष्णतेमुळे अंगाची लाही लाही होत असताना अंकुश शिरसाट यांनी आपल्या बैलजोडीला अंघोळ घालण्यासाठी गावानजीक सिद्धनाथ साखर कारखान्याच्या पाठीमागील तळ्यात नेले. बैलगाडी तळ्यात नेल्यानंतर पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने बैलगाडी तळ्यात मध्यभागी गेली आणि खोल पाण्यात उलटली. तेव्हा बैलांना वाचविण्यासाठी अंकुश शिरसाट यांनी आटोकाट प्रयत्न केला. परंतु ते स्वतः पाण्यात बुडाले. यात त्यांना स्वतःचा जीव गमवावा लागला. बैलजोडीपैकी एका बैलाचाही पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाला.

**कालव्यात पोहताना मुलाचा मृत्यू**

मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द गावात लमान तांड्यावर दुपारी रखरखत्या उन्हात पोहण्यासाठी कालव्यात गेलेल्या एका मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. अन्य एका मुलाला वाचवण्यास यश आले. विराज विनोद राठोड (वय ८) असे दुर्दैवी मृत मुलाचे नाव आहे. तो प्राथमिक शाळेत तिसरीच्या वर्गात शिकत होता. उन्हाळ्याच्या सुटीत तो इतर मुलांसह पोहण्याचेही प्रशिक्षण घेत होता. इतर मुलांसोबत विराज हा कालव्यात पोहण्यासाठी गेला असता त्याला थोड्याच वेळात दम लागला. त्यामुळे तो पाण्यात बुडाला. त्यांच्यासमवेत अन्य एक मुलगाही पाण्यात बुडू लागला. तेव्हा सर्व मुलांनी आरडाओरडा केला असता तरुणांनी पाण्यात उतरून एका मुलाला वाचवण्यात यश मिळिवले. मात्र विराज राठोड हा मरण पावला. कामती पोलीस ठाण्यात या दुर्घटनेची नोंद झाली आहे.

## बालिकेवर अत्याचारप्रकरणी आरोपीस २० वर्षे कठोर कारावासाची शिक्षा

कराड : दहा वर्षीय बालिकेवर खेळण्याचा बहाणा करून दोन वेळा अत्याचार करणाऱ्या आणि संबंधित मुलीस मारून टाकण्याची धमकी देणाऱ्या नराधम युवकास २० वर्षे कठोर कारावासाची शिक्षा आणि ५० हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती के. एस. होरा यांनी ही शिक्षा सुनावली. बापू उर्फ नितीन रमेश पाटोळे (३० रा. वारूंजी, ता. कराड) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. ही घटना नोहेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ दरम्यानची आहे. याबाबत पिडित मुलीने सांगितल्यावर आईने तक्रार दाखल केली होती.

याबाबत सरकारी वकील आर. सी. शहा यांनी दिलेली माहिती अशी की, १५ नोहेंबर २०२३ रोजी पीडित बालिका अंगणात खेळत असताना शेजारी राहणाऱ्या बापू पाटोळेने खेळण्याच्या बहाण्याने बालिकेला घरात नेले व तिच्याशी जबरदस्तीने अत्याचार केले. त्यानंतर दोन महिन्यांत दोन वेळा बालिकेवर हा अत्याचार झाला. तसेच याबाबत कोणास सांगितले तर मारून टाकण्याची धमकी बापू पाटोळेने बालिकेला दिली.

यानंतर २३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी दोन वाजता बालिका अंगणात खेळत असताना बापू पाटोळेने पीडित बालिकेला घरी बोलावले. मात्र, ती घाबरून घरी पळत गेली व तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. बालिकेच्या आईने याबाबत कराड शहर पोलिसांत फिर्याद दिली. सहायक पोलीस निरीक्षक एस. व्ही. पाटील यांनी सदर घटनेचा सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्यात सरकार पक्षातर्फे सहा साक्षीदार तपासण्यात आले. पीडित बालिका, तिची आई व वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षी ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस २० वर्षे कठोर कारावास व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

## बुलढाण्यामध्ये तीन वाहनांचा भीषण अपघात, ५ जणांचा मृत्यू

बुलढाणा: बुलढाणा जिल्ह्यात खासगी बस, बोलेरो आणि एसटी बस या तीन वाहनांचा भीषण अपघात झाला आहे. शेगाव-खामगाव महामार्गावर झालेल्या या अपघातात पाच जण मृत्यूमुखी पडल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये गाड्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

पहाटे साडे पाचच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. यावेळी भरधाव वेगात असलेली बोलेरो कार एसटी बसवर धडकली. यानंतर पाठीमागून येत असलेल्या खाजगी प्रवासी बसने या अपघातग्रस्त गाड्यांना धडक दिली. या भीषण अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला तर २४ जण यात जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मि ळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे. जखमी झालेल्यांवर खामगाव येथे रुग्णालयात उपचार सुरू आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार, वेगात असलेली बोलेरो शेगाव येथून कोल्हापुरच्या दिशेने जात होती.

तर एसटी महामंडळाची बस पुणे येथून परतवाडाच्या दिशेने जात होती. या दोन वाहनांची धडक झाली. त्यातच एक खाजगी बस या दोन गाड्यांना धडकली. हा अपघात इतका भीषण होता की ५ जण यात मृत्यूमुखी पडले तर २४ जण जखमी झालेत.

## येवला तालुक्यातील सावखेडा येथे दोन शाळकरी मुलांचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

**येवला (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सोमवारी, (दि. ३१) सकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास सावखेडे (ता. येवला) येथील समाधान गोरे यांच्या शेततळ्यात शुभम शांताराम गोरे, साई संदीप कुमावत (वय १२) ही दोन शाळकरी मुले अंघोळीसाठी गेली होती.

दरम्यान, यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने शेततळ्यातील पाण्यात बुडून दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी तालुका पोलीसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

भुजबळांनी घेतली मृत मुलांच्या नातेवाईकांची भेट - येवला दौऱ्यावर



असलेल्या माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी, येवला उपजिल्हा रुग्णालयात मृत मुलांच्या नातेवाईकांची भेट घेत सांत्वन केले.

तसेच मतदारसंघातील शेततळ्यांम ध्ये पुन्हा असे अपघात होऊ नये यासाठी शेततळ्यांना संरक्षक जाळी बसविण्याबाबत सूचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

यावेळी अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य तथा माजी नगराध्यक्ष हुसेन शेख, वसंत पवार, दीपक लोणारी, दत्ता निकम, मकरंद सोनवणे यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित

## व्यापारकराचा धसका; परिणाम कमी करण्यासाठी सरकारची चाचपणी, भांडवली बाजारांत आपटीने आर्थिक वर्षाचे 'स्वागत'

मुंबई / नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापार करात 'जशास तशी' वाढ करण्याच्या निर्णयाची बुधवारपासून अंमलबजावणी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मंगळवारी भारतीय भांडवली बाजारांम ध्ये तीव्र पडसाद उमटले आणि 'सेन्सेक्स', 'निफ्टी' या प्रमुख निर्दे शांकांत दीड टक्क्यापेक्षा जास्त घसरण झाली. तर अमेरिकेने वाढीव कर लादल्यास होणाऱ्या संभाव्य परिणाम ांची धग कमी करण्यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

ट्रम्प यांनी दिलेली समन्यायी व्यापारकराची धमकी आणि संभाव्य व्यापारयुद्धाच्या धास्तीने सलग दुसऱ्या सत्रात भांडवली बाजारांत समभाग विक्रीचा मारा राहिला. मंगळवारी नवीन आर्थिक वर्षाची सुरुवातच मोठ्या आपटीने होणे अनेक गुंतवणूकदारांसाठी धक्कादायक ठरले. उल्लेखनीय म्हणजे त्या आधी मार्चमध्ये सलग आठ सत्रांत 'सेन्सेक्स'-'निफ्टी' निर्देशांकांमध्ये प्रत्येकी जवळपास साडेपाच टक्क्यांची झेप घेत २०२५ मधील नुकसान पूर्णपणे भरून काढले होते. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून पुन्हा सुरू झालेल्या खरेदीने निर्माण केलेल्या उत्साहावर महिनाभरातील सर्वात मोठ्या घसरगुंडीने पाणी फेरले. मुंबई शेअर बाजाराचा 'सेन्सेक्स' १,३९०.४१ अंशांच्या

(पान ८ वर) (पान १ वरून)

घसरगुंडीने ७६,०२४.५१ या पातळीवर दिवसअखेर स्थिरावला.

दिवसाच्या मध्याला तर त्याची ही घसरण १,५०२.७४ अंशांपर्यंत विस्तारली होती. दुसरीकडे 'निफ्टी' निर्देशांक ३५३.६५ अंश गमावून २३,१६५.७०वर स्थिरावला. सर्वाधिक फटका हा माहिती-तंत्रज्ञान, खासगी बँका आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रांना बसला. गुंतवणूकदारांना एकूण ३.४४ लाख कोटी रुपयांचे नुकसान पाहावे लागले.

दरम्यान, ट्रम्प यांनी दिलेली मुदत संपत आली असताना भारतातील निर्यातदार उद्योजकांची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने चाचपणी सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भारताचा सर्वांत मोठा व्यापार भागिदार असलेल्या अमेरिकेच्या शिष्टमंडळाबरोबर गेल्या काही दिवसांपासून केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांची खलबते सुरू असून व्यापार करार करण्यासाठी पार्श्वभूमी तयार केली जात आहे.

वाणिज्य मंत्रालयातील सूत्रांच्या मते ट्रम्प यांच्या व्यापारकराचा परिणाम हा क्षेत्रानुसार वेगवेगळा असण्याची शक्यता असून क्षेत्रनिहाय उपाययोजना कराव्या लागणार आहेत. मात्र कोणत्या भारतीय मालावर किती कर लादला जाणार, हे अद्याप स्पष्ट नसल्याने उद्योग आणि सरकारी पातळीवर एकूणच गोंधळाची स्थिती असल्याचे चित्र आहे.

## अजित पवारांच्या बीड दौऱ्यात धनंजय मुंडे गैरहजर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार हे आज (२ एप्रिल) बीड दौऱ्यावर असणार आहेत. मात्र, अजित पवारांच्या या दौऱ्यावेळी जिल्ह्यातील पक्षाचे वरिष्ठ नेते व माजी मंत्री धनंजय मुंडे हे उपस्थित नसतील. धनंजय मुंडे यांनी स्वतःच याबाबतची माहिती दिली आहे. मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यापासून धनंजय मुंडे हे राजकीयदृष्ट्या फारसे सक्रीय दिसले नाहीत. आज अजित पवारांच्या दौऱ्यात सहभागी होऊन ते परत सक्रीय होतील, असं बोललं जात होतं. मुंडे अजित पवारांच्या स्वागताला हजर असतील असं पक्षाचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी म्हटलं होतं. मात्र, मुंडे या दौऱ्यावेळी उपस्थित नसतील, असं त्यांनी स्वतःच स्पष्ट केलं आहे.

बीडच्या केज तालुक्यातील म स्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी हे धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याचं जवळपास स्पष्ट झालं आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्यावर इतरही काही आरोप केले जात होते. याचदरम्यान, विरोधक व राज्यातील जनतेकडून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी तीव्र झाली होती. त्यानंतर प्रकृतीचं कारण सांगत मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.

**धनंजय मुंडे नेमकं काय म्हणाले?**

धनंजय मुंडे यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या आजच्या बीडमधील नियोजित दौऱ्यात मी पूर्णवेळ उपस्थित राहणार होतो. परंतु, माझी प्रकृती अद्यापही ठीक नसल्याने काल मला उपचारासाठी मुंबई येथे यावे लागले आहे. त्यामुळे बीडमधील आजच्या कार्यक्रमांना मी उपस्थित राहू शकणार नाही. याबाबत मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाला पूर्वसूचना दिली असून, यासंदर्भात कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये, ही विनंती.

दोन दिवसांपूर्वी गुढीपाडव्यानिमित्त परळीतील अनेक दुकाने व एका रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी धनंजय मुंडे हजर राहिले होते. त्यामुळे ते अजित पवारांच्या दौऱ्यावेळीही उपस्थित असतील, अजित पवारांबरोबर बीडम धील त्यांच्या नियोजित कार्यक्रमांत दिसतीलङ्क, असं सुरज चव्हाण यांनी म्हटलं होतं. मात्र आता धनंजय मुंडे हे अजित पवारांबरोबर दिसणार नाहीत.

# कर्जमाफीचा शब्दखेळ

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवरून राज्याचे अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हात वर केल्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सारवासारवीचे प्रयत्न चालू झाले आहेत. यंदा आणि पुढच्या वर्षी देखील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे आता अजित पवार यांच्या विधानावरून स्पष्ट झाले आहे. महायुतीने निवडणुकीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. महायुतीच्या नेत्यांनी ठिकठिकाणी जाहीर सभा घेताना देखील कर्जमाफीचा शब्द मतदार राजाला दिला होता. अजित पवार यांनी एका कार्यक्रमात बोलताना ३१ मार्चपर्यंत पीक कर्जाची रक्कम शेतकऱ्यांनी बँकांमध्ये भरावी असे आवाहन केले होते. आम्हाला १३ कोटी जनतेचा विचार करावा लागतो.

यापूर्वीही शेतकऱ्यांना विविध सवलती दिलेल्या आहेत तसेच त्यांना मोफत वीज दिलेली आहे असे आता अजित पवार म्हणत आहेत. निवडणुकांमधील नेत्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे राज्यातील शेतकरी कर्जमाफी कधी जाहीर होणार याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळेच अजित पवार यांना कर्जमाफी तूर्त होणार नाही, सगळ्या शेतकऱ्यांनी पैसे भरावेत असे आवाहन करणे भाग पडले आहे. पैशाचे सोंग करता येत नाही हे तर खरेच आहे परंतु निवडणूक काळात जनतेला आश्वासन देताना या नेत्यांना राज्याच्या आर्थिक परिस्थितीचे भान नव्हते का हा प्रश्न उपस्थित होतो. सर्वच माध्यमांमधून कर्जमाफी बाबत महायुती सरकारवर टीका सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अजितदादा जे बोलले तीच भूमिका सरकारची असल्याचे स्पष्ट केले. परंतु या पुढील काळात कर्जमाफी देणे शक्यच नसल्याचे अजित पवार म्हणालेले नाहीत, अशी सारवासारव केलेली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीरनाम्यात दिलेली वचने निश्चितच पाळणार असल्याचे म्हटले आहे. आमची आश्वासने म्हणजे 'प्रिंटिंग मिस्टेक' नसतात असे सांगत शिंदे यांनी काँग्रेसलाही चिमटा काढला आहे. राज्याची आर्थिक परिस्थिती आम्ही मजबूत करू आणि त्यानंतर लोकाभिमुख निर्णय निश्चित घेऊ असेही शिंदे यांनी आश्वासित केले आहे. कर्जमाफी हा एक निवडणुकीपुरता जुमला होता, हे आता महायुतीच्या नेत्यांनी मान्य करावे असे काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत. शिंदे सेनेचे आणखी एक नेते संजय शिरसाट यांनी महायुतीमधील इतर घटक पक्षांचा विचार घेतल्यानंतर अर्थमंत्र्यांनी अशी विधाने करावीत असे सुचवले आहे. एकूणच काय तर हा सगळा शब्दच्छल चालू आहे. राज्यातील शेतकऱ्यांना तूर्त तरी कर्जमाफी मिळणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. त्याचप्रमाणे लाडक्या बहिणींना देखील नजीकच्या काळात २१०० रुपये मानधन मिळणे अवघडच वाटत आहे. कोणतीही मोफत योजना अथवा मानधन स्वरूपात मिळणारे पैसे पुढे जाऊन भविष्यात घातकच ठरतात याचाही विचार सामान्य जनतेने करायला हवा.

## 'आयटीहब' : आता आणखी लेट नको, दहा दिवसात निर्णय घेण्याचे अजितदादांचे निर्देश

**कोल्हापूरात 'आयटीहब' उभारण्याचा मार्ग मोकळा**

**मुंबई :** कोल्हापूरच्या शेंडापार्क येथे 'आयटीहब' (खढ कींल) उभारण्यासाठी कृषी विद्यापीठाची ३४ हेक्टर जागा हस्तांतरीत करण्यात येणार असून कृषी विद्यापीठाला शेती, शिक्षण, संशोधन आदी कार्यासाठी पर्यायी जागा म्हणून कागल, पन्हाळा, हातकणंगले, राधानगरी तालुक्यातील ६० ते १०० हेक्टर एकत्रित जागेचा शोध घेण्यात यावा. येत्या दहा दिवसात कृषी विद्यापीठाच्या सहमतीने पर्यायी जागा अंतिम करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मुंबईत आयोजित विशेष बैठकीत दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या या निर्देशांमुळे कोल्हापूरातील शेंडापार्क येथे 'आयटीहब' निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कोल्हापूरात 'आयटीहब' उभारण्यासाठी शेंडापार्क येथील कृषी विद्यापीठाची ३४ हेक्टर जागा हस्तांतरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्या जागेच्या बदल्यात कृषी विद्यापीठाला जिल्ह्यातील अन्य ठिकाणची ६० ते १०० हेक्टर एकत्रित पर्यायी जागा देण्यात येणार आहे. ही जागा निश्चित करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील सह्याद्री राज्य अतिथीगृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीला वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ (व्हीसीद्वारे), कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, कोल्हापूरचे पालकमंत्री तथा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर (व्हीसीद्वारे), आमदार अमल महाडिक (व्हीसीद्वारे), नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, उद्योग सचिव डॉ. पी. अनबलगन, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (व्हीसीद्वारे), एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे (व्हीसीद्वारे), महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरीचे कुलसचिव डॉ. नितीन दानवले आदी मान्यवर आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# माझ्या उद्धारक शाहूराजांचा राज्याभिषेक!

**(२ एप्रिल: छत्रपती राजर्षी शाहू महाराज राज्याभिषेक दिन.)**

**राजर्षी शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. सन १८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते सन १९२२मधील त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते. सदर माहितीपूर्ण संकलित लेख वाचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांत.**

महाराष्ट्राला पुरोगामी राज्याचा चेहरा देण्यात सिंहाचा वाटा असणारे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक आज दि.२ एप्रिल १८९४ रोजी झाला. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आणि बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळामध्ये शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी अस्पृश्य आणि मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. प्राथमिक शिक्षण मोफत करणे, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करणे, आरक्षणाच्या धोरणाची सुरुवात करणे, कोल्हापूर संस्थानात शेतीसह उद्योगाला चालना देण्यासारखी अनेक महत्त्वाची कार्ये त्यांच्या काळात पार पडली. ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले, सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली, तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता दलित- अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराजांना 'राजर्षी' ही पदवी त्यांच्या राज्यभिषेकाच्या वेळी त्यांना त्याच्या क्षात्र गुरुने दिली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास 'फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र' असे म्हणतात.

शाहू महाराजांचा जन्म दि.२६ जून इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव (आप्पासाहेब) तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी दि.१७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व शाहू हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच दि.१ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. या वेळी त्यांचे वय १७ वर्षांचे होते आणि लक्ष्मीबाईचे वय १२ वर्षांहून कमी होते. दि.२ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण- राज्याभिषेक समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स.१९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे



राजे होते. राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यात झाला. महाराजानी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार केला व त्यासंबंधी कायदा आणला, आपल्या कृतीतूनच संदेश जावा यासाठी आपल्या चुलतबहिणीचा विवाह त्यांनी आंतरजातीय केला, अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत सन १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छ.शाहू महाराजांनी या शाळा सुरू केल्या- १. प्राथमिक शाळा, २. माध्यमिक शाळा, ३. पुरोहित शाळा, ४. युवराज/ सरदार शाळा, ५. पाटील शाळा, ६. उद्योग शाळा, ७. संस्कृत शाळा, ८. सत्यशोधक शाळा, ९. सैनिक शाळा १०. बालवीर शाळा ११. डोंबारी मुलांची शाळा, १२. कला शाळा इत्यादी. छ.शाहू महाराजांनी सुरू केलेली शैक्षणिक वसतिगृहे अशी आहेत- १. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस-१९०१, २. दिगंबर जैन बोर्डिंग-१९०१, ३. वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह-१९०६, ४. मुस्लिम बोर्डिंग-१९०६, ५. मिस क्लार्क होस्टेल-१९०८, ६. दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग-१९०८, ७. श्री नामदेव बोर्डिंग-१९०८, ८. पांचाळ ब्राह्मण वसतिगृह-१९१२, ९. श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह-१९१५, १०. इंडियन ख्रिश्चन होस्टेल-१९१५, ११. कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह-१९१५, १२. आर्यसमाज गुरुकुल-१९१८, १३. वैश्य बोर्डिंग-१९१८, १४. ढोर चांभार बोर्डिंग-१९१९, १५. शिवाजी वैदिक विद्यालय वसतिरगृह-१९२०, १६. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस-१९२०, १७. इंडियन ख्रिश्चन होस्टेल-१९२१, १८. नाभिक विद्यार्थी वसतिगृह-१९२१, १९. सोमवंशीय आर्यक्षत्रिय बोर्डिंग-१९२०, २०. श्री देवांग बोर्डिंग-१९२०, २१. उदाजी मराठा वसतिगृह, नाशिक-१९२०, २२. चौथे शिवाजी महाराज मराठा वसतिगृह, अहमदनगर-१९२०, २३. वंजारी समाज वसतिगृह, नाशिक-१९२०, २४. श्री शाहू छत्रपती बोर्डिंग, नाशिक-१९१९, २५. चोखामेळा वसतिगृह, नागपूर-१९२०, २६. छत्रपती ताराबाई मराठा बोर्डिंग, पुणे-१९२० आदी होत.

वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रखर झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले.

महाराजांनी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांनी मूकनायक हे पाक्षिक दि.३१ जानेवारी १९२०ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तात्काळ २५०० रुपयांची भरघोस मदत केली होती. अशा या लोकप्रिय लोककल्याणी राजांचे मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी दुःखद निधन झाले.

!! छ.राजर्षी शाहू महाराज राज्याभिषेक दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

# मोदींच्या नागपूर भेटीत संघ स्वयंसेवकाचे दर्शन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयास भेट दिली आणि त्यामुळे भाजपासह अनेकांच्या भुवया उंचावल्या. कारण मोदी हे पहिले पंतप्रधान आहेत की ज्यांनी संघाच्या नागपूर येथील मुख्यालयास भेट देऊन संघाचे आशीर्वाद घेतले. त्याला आता १२ वर्षे लोटली आहेत. मोदी यांनी २०१४ मध्ये संघाच्या मुख्यालयास भेट दिली होती, त्यानंतर आता पुन्हा १२ वर्षांनी मोदी यांनी नागपूर येथील संघाच्या मुख्यालयात जाऊन सरसंघचालक मोहन भागवत यांचे आशीर्वाद घेतले आणि पू. गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. पण याचे राजकीय अर्थ काढले जात आहेत. भाजपा नेत्यांनी म्हटले आहे की, यातून काही राजकीय अर्थ काढला जाऊ नये. पण मध्यंतरी संघ आणि भाजपाचा राजकीय विचारांचा मातृसंस्था असलेला रा. स्व. संघ यांच्यात बराच दुरावा निर्माण झाला होता आणि त्याचे फटके भाजपाला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बसले होते. त्या निवडणुकीत भाजपाने ४०० च्या पार असा नारा दिला होता आणि संघाचे पुरेसे पाठबळ नसल्याने भाजपाला अवघ्या २७० जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यामुळे भाजपाला अखेर भान आले आणि मग भाजपाने आपली चूक सुधारली आणि संघाला त्याचे होते ते श्रेय देऊ केले. त्याचाच परिपाक म्हणजे मोदी यांची ही संघ मुख्यालयास भेट आहे असे समजले जात आहे.

मोदी यांनी म्हटले की, संघ हा विशाल वटवृक्ष आहे आणि भाजपा किंवा संघ कार्यकर्ते त्याची फळे आहेत. पण भाजपाला आपल्या ताकदीचा गर्व झाला होता असा गैरसमज संघाच्या नेत्यांमध्ये पसरला होता आणि जे. पी. नड्डा यांनी तर स्पष्टपणे म्हटले होते की, आता भाजपाला संघाच्या आधाराची गरज नाही. पण नंतरच्या लोकसभा निवडणुकीत म्हणजे २०२४ साली भाजपाला त्याचा फटका बसला आणि त्यांच्या जागा ३०२ वरून २७० वर आल्या. याची चूक सुधारण्याचा प्रयत्न म्हणून मोदी यांच्या या नागपूर भेटीकडे पाहिले जात आहे. संघ हा भाजपाचा वैचारिक गुरू(मेटॉर) आहे यात काही गुप्त नाही. पण यापूर्वी भाजपाचे माजी पंतप्रधान आणि वरिष्ठ नेत्यांनी सरकार आणि संघ यांच्यात फरक राहील याची दक्षता घेतली होती. अनेक नेत्यांनी आपण संघाच्या मुशीतून तयार झालो असल्याची जाहीर कबुली दिली असली तरीही त्यांनी याची जाहीर वाच्यता केली नव्हती किंवा आपली राजकीय कारकीर्द संघापासून अलिप्त आहे असा त्यांचा आव होता. पण मोदी यांनी त्या सर्वांना तिलांजली दिली आहे आणि भाजपा आणि संघ यांचे संबंध आहेत ते कधीही लपवून ठेवले नाहीत. जे. पी. नड्डा यांच्या वक्तव्यानंतर उभय संघटनांमध्ये निर्माण झालेली कटुता कमी करण्यात मोदी यशस्वी झाले आहेत. मोदी आणि मोहन भागवत यांनी कटुता विसरून अयोध्येत राम मूर्तीच्या प्रतिष्ठापना समारंभात एकत्र व्यासपीठ शेअर केले होते. काल नागपूर येथे बोलताना मोदी यानी रा. स्व. संघाचा उल्लेख भारताच्या राष्ट्रीय संस्कृतीचा कधीही न मिटणारा अक्षय वटवृक्ष आहे असे सांगून यथार्थ उद्गार काढले यात काही शंका नाही.

संघाला आता शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्तही मोदी यांच्या या नागपूर भेटीचे औचित्य होते. संघ आणि भाजपा यांच्यातील दरी मिटून काढली जाईल आणि पुन्हा या दोन्ही संघटना एकत्र येऊन जनतेला चांगले सरकार देतील यात काही शंका नाही. संघ हा भारताच्या अमर संस्कृतीचा अमर वटवृक्ष आहे अशा शब्दांत मोदी यांनी संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याप्रकरणी गौरवौद्गार काढले आहेत. आता मोदी यांनी पुढाकार घेतला आहे त्यामुळे संघ आणि भाजपा यांच्यातील दरी कमी होईल आणि पुन्हा त्यांचे संबंध सुरळीत होतील असे समजण्यास हरकत नाही. मोदी यांचा दौरा राजकीय नाही अशी पुस्ती जोडायला शहर भाजपाचे अध्यक्ष बावनकुळे विसरले नाहीत. संघाच्या मुख्यालयात मोदी यांनी भेट देऊन दुरावा कमी केला आहे असे म्हटले जात आहे.

या दोन संघटनांमधील संबंधाची कल्पना नसलेले उपटसुंभ अनेक शंका काढत असतात. मोदी गेली कित्येक वर्षे नागपुरात जात आहेत पण संघाच्या मुख्यालयात एकदाही गेले नाहीत अशी शंका त्यांच्या मनात असते. पण त्याचे उत्तर असे आहे की, मोदी रेशीमबागेत गेले आणि त्यांनी सरसंघचालक पू. गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. भाजपा आणि संघ यांच्यात अतूट नाते आहे आणि त्याला कुणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे ज्या लोकांचा पोटशूळ उठला आहे तो राजकीय आहे असा त्याचा अर्थ आहे. कित्येक नेते संघाच्या मुशीतून तयार झाले आहेत आणि हे ते नाकारतही नाहीत. त्यामुळे मोदी यांनी संघात जाणे सोडले किंवा त्याच्या काळापासून दोन संघटनांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे असे म्हणणे म्हणजे या दोन्ही संघटनांच्या कार्याची जाण नसल्यासारखे आहे. मोदी यांनी आपल्यातील संघ स्वयंसेवकाचे दर्शन अनेकदा घडवले आहे. त्यामुळे मोदी रविवारी नागपूर येथे संघाच्या मुख्यालयात आले तेव्हा तेथे प्रचंड उत्साहाचे वातावरण होते. विशेष म्हणजे मोदी यांनी पायी फिरून सर्व मान्यवरांचे दर्शन घेतले. त्यांनी आपल्यातील पंतप्रधानांचा तोरा दाखवला नाही हे त्यांचे मोठेपण होते तसेच ते संघाचे संस्कार होते. मोदी यांच्या चेहऱ्यावरून स्वगृही आल्याचे समाधान दिसत होते. ही बाब लाखो संघ कार्यकर्त्यांना दिलासा देणारी आहे. नरेंद्र मोदी यांच्या संघाच्या मुख्यालयात जाऊन मान्यवरांच्या भेटी घेणे यामुळे दोन्ही संघटनांमध्ये निर्माण झालेली दुरत्वाची भावना कमी होण्यास मदत झाली आहे आणि हेच मोदी यांच्या या भेटीचे फलित आहे हे निश्चित.

# झोपडपट्टी परिसरात पाण्याची उधळपट्टी!

## राखीव पाणीसाठा वापरण्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेची मागणी

मुंबई : मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने (इचउ) राज्य शासनाकडे राखीव पाणीसाठा वापरण्याची मागणी केली आहे. मात्र, शहरात सुरू असलेल्या विविध विकासकाम ंदरम्यान जलवाहिन्यांना गळती लागून शेकडो लिटर पाण्याचा अपव्यय होत आहे. अशातच अनेक झोपडपट्टी परिसरात मोठ्या प्रमाणात पाण्याची उधळपट्टी सुरू असून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत आहे.

बोळांमधील जलवाहिन्यांना बूच लावण्यात येत नसल्यानेही मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. अनेकदा चिंचोळ्या गल्ल्या आणि प्रत्येक बोळांमध्ये लक्ष ठेवणे महापालिकेला शक्य होत नाही. अशी प्रकरणे निदर्शनास येत नसल्याने संबंधितांवर कारवाई होत नाही. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ऊर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या धरणांमध्ये पाणीसाठा ३५ टक्क्यांखाली गेला आहे. वातावरणातील उष्म्यामुळे मुंबईकरांची पाण्याची गरजही वाढली आहे. मुंबईकरांना पाणी कपातीचा सामना करावा लागू नये, यासाठी पालिकेने राज्य शासनाकडे राखीव पाणीसाठा वापरण्यासाठी विनंती केली आहे. दरम्यान, मुंबईत सुरू असलेल्या रस्ते काँक्रिटीकरणादरम्यान दररोज जलवाहिन्या फुटण्याच्या छोट्या- मोठ्या घटना घडत असून त्यातूनही पाण्याची नासाडी होत आहे. कमी दाबाने पाणी येणे, अपुरा पाणीपुरवठा आदी समस्येमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. मात्र, अनेक ठिकाणी विशेषत: झोपडपट्टी परिसरात पाण्याचा अपव्यय होत आहे. विकासकामे, मेट्रो प्रकल्प, जलवाहिन्या बदलण्याची कामे आदी विविध कामांमुळे दररोज जलवाहिन्यांना गळती लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे पाण्याची नासाडी होते. तसेच महापालिकेच्या कामगारांनाही जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणी साठा कमी होऊ लागला आहे. त्यातच दररोज फुटणाऱ्या जलवाहिन्यांतून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते. झोपडपट्टी आणि अन्य परिसरात विनाकारण होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध कारणांमुळे दररोज होणारा पाण्याचा अपव्यय सुरूच राहिल्यास मुंबईकरांची पुरेशा पाण्याअभावी गैरसोय होण्याची दाट शक्यता आहे.

# कार्यकर्त्यांच्या खांद्यावर चळवळ मोठी होते कार्यकर्त्या मोठा होताना दिसत नाही हि खंत आहे - कवी तन्हा नागपुरी



नागपूर दि.१/ चळवळीला सोन्याचे दिवस आले पाहिजे म्हणून कार्यकर्त्यांनी आपल्या घरादाराची राखरांगोळी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले तेव्हाच आज चळवळ मोठी झाली परंतु हे सोन्याच्या दिवसाची सावली सुद्धा कार्यकर्त्यांच्या डोक्यावर पडली नाही चळवळीला राजकीय मुलामा लागला कार्यकर्त्या मोठा होताना मी पाहिले नाही असी खंत सुप्रसिद्ध कवी तन्हा नागपुरी यांनी व्यक्त केली ते रिपब्लिकन नेते मामासाहेब उपाख्य सुखदेव मेश्राम यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंरिमो चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे हे होते प्रदेश उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले तर रामभाऊ वाहणे यांनी दिपप्रज्वलन केले नामदेवराव निकोसे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्या आर्थिक मुक्ती अभियानाचा प्रारंभ करण्यात आला या प्रसंगी ओबीसी नेते राजू पांजरे, अँड मिलिंद खोब्रागडे, चरणदास गायकवाड यांनी विचार मांडले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष प्रा.रमेश दुपारे यांनी केले तर आभार प्रदर्शन अतुल गंगापूरकर यांनी केले कार्यक्रमात प्रामुख्याने अँड संजय सोमकुवर, रोहीत पांडे, अभिषेक मिश्रा शालिक बांगर, मनोहर इंगोले, उपस्थित होते

# मुख्यमंत्र्यांच्या ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवाना पाठवलेल्या पत्रास केराची टोपली - राजेंद्र दाते पाटील

## कार्यकारी अभियंत्याचा पराक्रम; टी ओ डी मिटर प्रकरण भोवणार

मुंबई(प्रतिनीधी): पाच वर्षांत वीज दर २४ टक्के घटणार असल्याचे मुख्यमंत्री सांगतात पण स्मार्ट मीटरचा नागरीकांना मोठा भुर्दंड पडणार असल्या मुळें मुख्यमंत्र्यांनी जनहितार्थ तो निर्णय बदलावा अशी मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव व शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी केली होती त्यावर महाराष्ट्र राज्य शासनाच्या ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव अभा शुक्ला (आय ए एस) यांचें कडे योग्य निर्देशा सह निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठवले आहे. परंतु या प्रशासकीय कार्यास स्मार्ट मीटर टीओडी बाबत

बदलण्याचा पत्ररुपी आदेश निर्णय महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल डीस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेड अर्बन विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी दिलेला असुन हा मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचा अवमान असुन याची गंभीरता पहाता मुख्यमंत्री यांचे कडे तक्रार केली जाणार आहे.

राज्य शासनाकडे या पूर्वीच मागणी केली होती की,पोस्टपेड विद्युत मीटर जोडणी त्वरीत बंद करावी स्मार्ट प्रीपेड/ टी ओ डी मीटरला नागरिकांचा संपूर्ण तीव्र नकार व विरोध असुन एन सी सी लिमिटेड कंपनी हैदराबादचे कर्मचारी नागरिकांची दिशाभूल करून सदरचे टी ओ डी मीटर लाऊन मीटर बदलण्याचा सपाटा लावत असुन नागरीक या मुळे भयभीत झाले असुन सध्याचे पोस्टपेड मीटर व जोडणी आहे तशीच चालू ठेवावी व पोस्ट पेड विद्युत मीटर जोडणी तात्काळ बंद करावी अशी लेखी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन द्वारे सादर केलेली आहे..

> १००पेक्षाही जास्त युनिट वापर होत आहे. जर या योजनेअंतर्गत ३०० युनिट पर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळणार असेल तर नियोजन १०० युनिट पर्यंतच का बरे करत आहात ? हा सवाल त्यांनी उपस्थित केला असुन जादा वीज निर्मिती केल्यास ती सरकार खरेदी करेल. या स्मार्ट मीटरचा टी ओ डी चा भुर्दंड अशा मीटरचा अट्टाहास रद्द करून सर्व सामान्य जनतेस न्याय द्यावा अशी मागणी त्यानी केली असता हे प्रकरण आता मुख्यमंत्र्यांनी उर्जा विभागाच्या सचिव आभा शुक्ला यांचें कडे पाठवलेला असताना एन सी सी लिमिटेड कंपनी हैदराबाद आणि कार्यकारी अभियंता अर्बन विभाग छत्रपती संभाजीनगर यांचा मीटर बदलण्याचा मनमानी निर्णय तात्काळ थांबवावा अशी मागणी सर्वच थरातून होत आहे.



सदरचे मीटर नागरीकांना भविष्यात अनेक मार्गाने आर्थिक अडचणीत टाकणारे ठरणार असल्या मुळें ते लावण्यास आमचा तीव्र विरोध आहे.केंद्र सरकारचे अनुदान वगळता या मीटर्सचा उर्वरित सर्व खर्च वीजदर निश्चिती याचीके द्वारे आयोगाकडे मागणी केला जाईल व आयोगाच्या आदेशा नुसार वीज दरवाढीच्या रुपाने १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केला जाईल हे निश्चित व स्पष्ट आहे. त्यामुळे केवळ महावितरण कंपनी वा येणाऱ्या खाजगी वितरण कंपन्या वा सरकार यांच्या हितासाठी व खाजगीकरणाच्या वाटचाली तील पुढचा टप्पा म्हणनूच ही योजना आणलेली आहे असे स्पष्ट दिसून येत आहे.त्यामुळे या स्मार्ट म्हणवल्या जाणाऱ्या प्रीपेड मीटर्सना संपूर्ण पणे राज्यभरात जनतेचा विरोध आहे म्हणून विनंती की, वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणते मीटर वापरायचा याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क संबंधित ग्राहकांना आहेत. कंपनी अघोषित सक्ती करून ग्राहकांच्या या हक्काचे व कायदेशीर तरतुदींचे संपूर्णपणे उल्लंघन करीत आहे, हे राज्यातील तमाम जनतेस अजीबात मान्य नाही. त्यामुळे ग्राहक म्हणून हक्का नुसार राज्य भरातील सध्याचाआहे तोच मीटर पुढेही कायम ठेवण्यात यावा अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे केली असुन पुढे महावितरण कंपनीने राज्या तील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स टी ओ डी लावणार असे जाहीर केले होते तसेच हे मीटर्स कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहिरात केली आहे.या निवीदा नुसार मीटर्सचा खर्च १२०००/- रु. प्रति मीटर या प्रमाणे आहे.प्रीपेड मीटर साठी केंद्र सरकारचे प्रति मीटर ९००/- रु. अनुदान वगळता प्रत्येक ग्राहका मागे किमान ११९००/- रु. प्रति मीटर खर्च कर्ज काढून केला जाणार आहे.या कर्जास राज्यभरातील सर्वसामान्य जनतेची मान्यता तर नाहीच नाही परंतु सदरचे मीटर एक ही ग्राहक लाऊन घेणार नाही आणि पर्यायाने असा कुठलाही खर्च जनते वर लादने म्हणजे अन्याय ठरणार असल्याचे त्यांनी नमुद केले असुन सदरच्या खर्चा मुळे या कर्जावरील व्याज,घसारा, संबंधित खर्च व इतर कारणा साठी वीजदरा मध्ये वाढ होणार आहे हे निश्चीत आहे. मोठे आर्थिक संकट या मुळे राज्य भरातील ग्राहका समोर उभे राहणार असून प्राप्त हक्क व अधिकारा नुसार मुळात असे किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या मीटर शिवाय कुठले ही इतर मीटर वापर राज्यांतील जनता वापरत नसल्यामुळे या वाढीव दराचा कोणताही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बोजा जनतेवर मनमानी पद्धतीने लावता येणार नाही याची राज्य शासनाने नोंद घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी लेखी सुचित केल्याची सुद्धा गंभीर दखल घेतली गेली असुन या बाबत असे कुठलेही मीटर लावु नये व तशी पुढील कार्यवाही अति तातडीने करावी ही विनंती करण्यात येउन सक्तीने असे मीटर लावण्याचा प्रयत्न केल्यास अशा सक्तीच्या जोडणीला प्रखर नागरी विरोध होईल याची कृपया गांभीर्याने नोंद घ्यावी अशी विनंती अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.

# तृतीयपंथीयांच्या हक्कांचेही होणार संरक्षण - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी कल्याण मंडळाची पुनर्रचना



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्य शासन राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. यासाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना ही करण्यात आली आहे. तृतीयपंथी यांच्या हक्कांचे संरक्षण अधिक सक्षमतेने आणि प्रभावी होण्यासाठी या मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे, याबाबतचा निर्णय घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

या संबंधीच्या निर्णयाची प्रत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते तृतीयपंथी समुदायाच्या प्रतिनिधींना सह्याद्री अतिथीगृह येथे देण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीय समुदायाच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्य यासंदर्भातील विविध योजना राबवण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे तृतीयपंथीय समुदायाला अधिक सक्षम आणि न्याय्य प्रतिनिधित्व मिळेल, तसेच त्यांचे हक्क आणि कल्याण अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करता येईल.

सामाजिक न्याय मंत्री शिरसाट म्हणाले, सन २०१८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाच्या संरचनेत बदल करून सुधारित स्वरूपात नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १३ अशासकीय सदस्यांची नियुक्ती रद्द करून त्याऐवजी नव्या सदस्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी तृतीयपंथीयांसाठीचे धोरण - २०२४, ११ मार्च २०२४ रोजी जाहीर करण्यात आले होते. या धोरणानुसार राज्यस्तरीय मंडळाच्या संरचनेत सुधारणा करणे आवश्यक होते.

नव्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्क संरक्षण आणि कल्याण मंडळाचे अध्यक्ष असतील. तसेच समाज कल्याण आयुक्त हे सदस्य सचिव असणार आहेत. तृतीयपंथीय प्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी अशा अशासकीय सदस्यांचाही मंडळात समावेश करण्यात आला आहे.

# 'मोदींनी कधी निवृत्त व्हावे हे जनता ठरवते, सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही'

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी साधला संजय राऊतांवर निशाणा

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नागपूर दौऱ्यावरुन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या दाव्यावरुन राजकीय वतुर्ळात चर्चा सुरु आहे. नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या भेटीवर भाष्य करताना संजय राऊत यांनी नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये निवृत्त होणार असल्याचे म्हटले. त्यानंतर भाजपाकडून संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका करण्यात येत आहे.

शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवृत्तीबाबत केलेल्या विधानावर भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे (उहरपवीरीहशज्ञहरी इुरपर्ज्ञीश्रश) यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. 'मोदींनी कधी निवृत्त व्हावे हे जनता ठरवते, सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही,' अशा शब्दांत त्यांनी राऊतांवर निशाणा साधला.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवर पोस्ट करत संजय राऊत यांच्या वक्तव्याला राजकीय स्टंटबाजी असल्याचे म्हटले. '७५ वर्षांनंतर नरेंद्र मोदींनी राजकारण सोडावे, असा कोणताही नियम नाही. भाजपाच्या अधिकृत धोरणातही असे काही नमूद केलेले नाही. तसेच भारतीय संविधानातही अशा प्रकारचा कोणताही ठराव नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले.

**२०४७ पर्यंत मोदींचे नेतृत्व कायम राहील** - पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०४७ पर्यंत भारत विकसित करण्याचा संकल्प केला आहे आणि तो त्यांच्या नेतृत्वाखालीच पूर्ण होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

भाजपा नेत्यांचे हे विधान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय संघर्ष आणखी तीव्र करण्याची शक्यता आहे. संजय राऊत यांनी मोदींच्या निवृत्तीबाबत केलेल्या विधानानंतर भाजपाकडून जोरदार प्रतिउत्तर येत असून यावर शिवसेनेची अधिकृत प्रतिक्रिया येणे बाकी आहे. सर्वज्ञानी संजय राऊत म्हणजेच रडत रौत म्हणजे उबाठासेनेचा पोपट झालाय. आता या उबाठांनी पाळलेल्या पोपटाने भाकड भविष्य सांगायला सुरूवात केली आहे. एकच सांगणे आहे या स्वयं घोषित विश्वगुरूने स्वतःच्या घराकडे आधी लक्ष द्यावे.

भारतीय जनता पार्टी, प्रधानमंत्री मोदीजी वगैरेंवर बोलण्याची एकतर त्यांची कुवत नाही, आणि तुमच्या विश्लेषणाची आमच्या पक्षाला गरजही नाही. भारतीय जनता पार्टीचा पुढचा वारसदार वगैरेंच्या गोष्टी बोलण्यापेक्षा जरा स्वतःच्या पक्षाला माफ करा गटाला पडलेले खिंडार सांभाळा. जरा गटप्रमुख असलेल्या उबाठांना तर आपण विधानपरिषद आमदार आहोत याचा देखील विसर पडलाय.

# दिशा सालियन प्रकरणी सुनावणीपूर्वीच न्यायमूर्तींच्या भूमिकेवर प्रश्न

**मुंबई :** आपल्या मुलीचा मृत्यू संशयित असून तिची हत्या झाल्याचा आरोप करत दिशा सालियनच्या वडिलांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा नव्याने तपास व्हावा अशी मागणी त्यांनी न्यायालयात केली आहे. तसेच, आपल्या वकिलांसह त्यांनी मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेऊन याप्रकरणी तक्रारही दाखल केली आहे. आपल्या तक्रारीत शिवसेना उबाठा पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे, सूरज पांचोली यांच्यासह आणखी काही जणांची नावे घेत गंभीर आरोप केले आहेत. आता, याप्रकरणाच्या न्यायालयीन सुनावणीला सुरुवात होत आहे. दिशा सालियन मृत्यूप्रकरणी दिशाचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर बुधवारी (दि. २ एप्रिल) रोजी मुंबई उच्च न्यायालयात पहिली सुनावणी होत आहे. त्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर दिशाचे वडील सतिश सालियन यांच्या वकिलांनी पत्रकार परिषद घेऊन थेट न्यायाधीशांच्या कार्यक्षम तेवरच प्रश्न उपस्थित केले आहेत.

आमच्याकडून सुनावणीची पूर्ण तयारी झाली आहे, मात्र उद्या सुनावणीत काही होण्याची शक्यता कमी आहे. कारण, ज्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे ही सुनावणी होणार आहे, त्यांच्याविरोधातच आमची तक्रार आहे, असे सतिश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी म्हटले.

# पर्यावरणपूरक वीज निर्मितीसाठी पुढाकार घ्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आगामी काळात वीज निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कोळशाची गरज आहे यापासून मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण होईल हे टाळण्यासाठी पर्यावरण पूर्वक वीज निर्मितीची गरज आहे यासाठी सर्व ग्रामस्थांनी पुढाकार घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रशासन व ग्रामपंचायत कार्यालय रांजणगाव शेनपुंजी तालुका गंगापूर च्या वतीने आज रांजणगाव शेणपुंजी येथील रावते मंगल कार्यालयात 'हर घर सोलर,घर घर उजाला,' पंतप्रधान सूर्यघर योजने बाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी



मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. प्रशांत बंब होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी ग्रामपंचायतीने 'हर घर सोलर घर घर उजाला' हा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल प्रशासनाच्या वतीने ग्रामपंचायतीचे अभिनंदन करून प्रत्येक कुटुंबाने आपल्या छतावर वीज निर्मितीसाठी सोलर पॅनल बसविण्याचे आवाहन केले.

विजेच्या दरात दिवसेंदिवस वाढ होत आहे.कुटुंबाच्या आर्थिक बचतीसाठी बँकेच्या सहकार्यातून ग्रामपंचायत मधील सर्व कुटुंबांनी आपल्या छतावर सोलर पॅनल बसून संपूर्ण राज्यात आदर्श निर्माण व्हावा असे काम करावे यासाठी आमदार म्हणून जी काही मदत लागेल ती पूर्ण करीन, असे आमदार प्रशांत बंब यांनी स्पष्ट केले.

सोलर पॅनल च्या माध्यमातून वीज निर्मिती साठी लागणारा खर्च बाबत वीज वितरण कंपनीचे मुख्य अभियंता पवन कुमार कछोट यांनी मार्गदर्शन केले. यासाठी बँकेमार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जाबाबत अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार यांनी संपूर्ण माहिती दिली.

आज कन्या दिनानिमित्त आरोग्य विभागाच्या वतीने ग्रामपंचायत मधील महिलांना आरोग्य कीटचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले भुमी अभिलेख विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार ग्रामपंचायतच्या वतीने यावेळी मान्यवरांच्या हस्ते पी आर कार्ड चे वाटप करण्यात आले सोलर पॅनल बसविण्यासाठी नोंदणीचे काम सुरू करण्यात आले.

कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समिती गंगापूर चे संचालक दीपक बडे, ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता महालकर, उप सरपंच शिवराम ठोंबरे, जिल्हा परिषद सदस्या उषा हिवाळे, दत्तू हिवाळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक सिरसे, पोलीस अधीक्षक डॉ विनय कुमार राठोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तथा जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक राजेंद्र देसले, गटविकास अधिकारी पंचायत समिती गंगापूर सुहास वाघचौरे, मेडाचे प्रतिनिधी शिरसाट, विस्तार अधिकारी पंचायत भारत घुगे, अशोक घोडके, ग्रामविकास अधिकारी गणेश धनवई ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘जिल्हाधिकारी तहसिलचे दारी’; नागरिकांचा प्रतिसाद; येण्या-जाण्याचा वाचला त्रास

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ग्रामिण भागातील नागरिकांनाआपल्या तक्रारी, गाऱ्हाणे मांडण्यासाठी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात यावे लागू नये यासाठी ‘जिल्हाधिकारी तहसिलचे दारी’ हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाची आज सुरुवात झाली. आज या उपक्रमाद्वारे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ४० हून अधिक नागरिकांचे म्हणणे ऐकले. त्यातील ७ जणांच्या तक्रारींवर जागीच निकाल देण्यात आला.

‘जिल्हाधिकारी तहसिलचे दारी’या उपक्रमात जिल्हाधिकारी कार्यालयातून स्वतः जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन संगीता राठोड सहभागी झाले. तर सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार तसेच तहसिल कार्यालयात आलेले अभ्यागत, तक्रारदार दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.



नागरिकांनी प्रत्यक्ष जिल्हाधिकाऱ्यांनी संवाद साधण्याचाही अनुभव या उपक्रमाच्या माध्यमातून घेतला.आजच्या दिवशी या उपक्रमात आज एकूण ४० तक्रारी पैकी सात तक्रारींचा जागेवरच निकाल देण्यात आला. ग्रामीण भागात स्मशानभूमीची जागा, जमीन मोजणी, अतिक्रमण, सातबारा नोंद, अतिवृष्टीचे अनुदान अप्राप्त, संत सेवालाल बंजारा तांडा सुधार योजना, कुळ कायद्यातील जमीन विक्री बाबतची परवानगी, संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान वेळेत अनुदान मिळण्याची मागणी,वारसा हक्क प्रमाणपत्र, शिवरस्ता तयार करून मिळणे बाबत या संदर्भातील तक्रारी नागरिकांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडे मांडल्या. या तक्रारींचे निराकरण करण्याबाबत संबंधित तहसिलदार व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी स्वामी यांनी मार्गदर्शन केले.

आजच्या या उपक्रमात सोयगाव तालुक्यातील संदीप इंगळे,सिल्लोड येथील श्री.भोसले, फुलंब्री तालुक्यातील प्रभाकर राठोड, काशिनाथ गुंजाळ, वैजापूर तालुक्यातील चिकटगाव येथील बबनबाई सोरसे,गणेश हिवाळे, छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील रमेश पवार, पैठण तालुक्यातील गाडेकर अशा ४० तक्रारदारांनी आपले म्हणणे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यासमोर मांडले व तक्रारींच्या निराकरणाचे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी संबंधितांना दिले.

दर सोमवार आणि गुरुवार या दोन दिवस हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नागरिकांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

नागरिकांच्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी हा उपक्रम राबविला असून याची अंमलबजावणी जिल्ह्यात प्रभावीपणे करण्यात येत आहे. यामध्ये होणाऱ्या तक्रारीची नोंद प्रत्येक तहसील मध्ये करण्यात येणार असून यांचा आढावा वेळोवेळी घेण्यात येणार आहे. रजिस्टरमध्ये केलेल्या नोंदीची तपासणी संबंधित भेटीच्या वेळी अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. जेणेकरून संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही बाबत आढावा घेतला जाणार आहे. नागरिकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असून ती वेळेत करावी व आपल्या अर्ज निकाली काढण्यासाठी संबंधित यंत्रणेलाही सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी नागरिकांशी संवाद साधताना केले.

# दिव्यांगांना समान संधीसाठी सहाय्य करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दिव्यांग बांधवांसाठी समाजाने सहानुभूतीने नव्हे, तर समान संधीच्या दृष्टिकोनातून सहाय्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन आणि एस. आर. ट्रस्ट, मध्यप्रदेश अलीमको यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगांसाठी सक्षम संस्था, डॉ. हेडगेवार रुग्णालय संचलित संत रोहिदास आरोग्य केंद्र येथे ऑन द स्पॉट कृत्रिम हात, पाय आणि कॅलिपर्स वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी एस.डी. चव्हाण, सक्षम संस्थेचे अध्यक्ष बी. एन. राठी, प्रा. डॉ. भगवान देशमुख, सचिव डॉ.संदीप डफळे, आरोग्य अधिकारी डॉ. रुपेश जाधव व अरविंद अवसरमल उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते लाभार्थ्यांना कृत्रिम अवयवांचे वाटप करण्यात आले.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, या उपक्रमामुळे दिव्यांगांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल. समाजात दिव्यांगांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या शिबिरांतून त्यांच्या आत्मनिर्भरतेस चालना देता येते असे प्रतिपादन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी दिव्यांग व्यक्तींना त्यांची गरज ओळखून योग्य कृत्रिम अवयव बसवले तसेच, त्याचा योग्य वापर आणि देखभालीबाबत मार्गदर्शन केले. लाभार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले आणि आयोजकांचे आभार मानले. अशा उपक्रमांमुळे दिव्यांग व्यक्तींच्या आत्मविश्वासात वाढ होते आणि त्यांना स्वयंपूर्ण जीवन जगण्यास मदत मिळते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात विविध जिल्ह्यातून आलेल्या ८६ दिव्यांगांना कृत्रिम हात आणि पाय बसविण्यात आले. तसेच संभाजीनगर जिल्ह्यातील गेल्या सहादिवसात संपन्न झालेल्या तालुकानिहाय शिबिरात पैठण १५४, गंगापूर १००, वैजापूर १२५, कन्नड १४४, सिल्लोड १२५ दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविण्यात आले.

# ‘एआय’ सेंटर्स ऑफ एक्सलन्ससाठी महाराष्ट्र शासन, मायक्रोसॉफ्ट यांच्यात सामंजस्य करार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उपस्थिती

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात बुद्धिमत्ता उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि मायक्रोसॉफ्ट यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला.

करारावर महाराष्ट्र शासनाच्यावतीने मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि मायक्रोसॉफ्टचे वेंकट कृष्णन यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव नवीन सोना, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले तसेच मायक्रोसॉफ्टचे विक्रम काळे, विशाल घोष आदी उपस्थित होते.

हा सामंजस्य करार महाराष्ट्र शासनाच्या ङ्गडिजिटल भारत, आत्मनिर्भर महाराष्ट्रङ्क या संकल्पनेला बळकटी देणारा आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शासन अधिक सक्षम, लोकाभिमुख आणि पारदर्शक होईल, ज्याचा थेट लाभ नागरिकांना मिळेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, मायक्रोसॉफ्टसोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे राज्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात प्रशिक्षण मिळिवण्याची संधी मिळणार आहे. ही भागीदारी महाराष्ट्राच्या २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या स्वप्नाला गती देईल. तसेच महत्त्वाच्या पायाभूत सुविधा आणि प्रकल्पांना अधिक सक्षम करेल. याचबरोबर राज्याच्या नवकल्पना, प्रगती आणि उद्योजकतेला चालना मिळेल. यामुळे ही भागीदारी महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारी ठरेल.

### महाराष्ट्राला डिजिटल प्रशासनात आघाडीवर नेणार

महाराष्ट्र हे ‘एआय’ आधारित सरकारी सेवा सुधारण्यासाठी देशातील अग्रणी राज्य बनेल. जागतिक कंपन्यांसाठी महाराष्ट्र हे ‘एआय’ आणि तंत्रज्ञानासंबंधी गुंतवणुकीसाठी एक आदर्श केंद्र बनेल. नाविन्यपूर्ण प्रशासनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नागरिकांना उत्तम सेवा आणि सुविधा मिळतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

**राज्यभरात तीन ‘ए.आय.’ उत्कृष्टता केंद्रे**

मुंबई- भूगोल विश्लेषण केंद्र : भूगोल-संबंधित प्रगत विश्लेषणासाठी, जी.आय.एस. आणि उपग्रह इमेजरीद्वारे धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्य. हे केंद्र मुख्य सचिव कार्यालयात कार्यरत राहील. उपग्रह इमेजरी विश्लेषण, भू-सांख्यिकी व्यवस्थापन आणि जी.आय.एस.-आधारित वापराच्या माध्यमातून शासनाच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस मोठी मदत होईल.

**पुणे** – न्यायवैज्ञानिक संशोधन आणि ‘ए.आय. केंद्रः’ गुन्हे तपास आणि न्यायवैज्ञानिक विश्लेषणासाठी ए.आय.चा उपयोग वाढविणे.

नागपूर – मार्व्हेल केंद्रः कायद्यांची अंमलबजावणी, दक्षता आणि सुधारित प्रशासनासाठी ‘ए.आय.’वर आधारित संशोधन आणि प्रशिक्षण तसेच, राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना ‘ए.आय.’ प्रशिक्षण व मायक्रोसॉफ्ट प्रमाणपत्रे प्रदान केली जातील. एम.एस. लर्न या जागतिक दर्जाच्या प्लॅटफॉर्मद्वारे प्रशासन अधिक सक्षम व तंत्रज्ञानस्नेही होईल.

मायक्रोसॉफ्ट कोपायलट (Co{ilot) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शासनाच्या विविध कार्यप्रणालींमध्ये लक्षणीय सुधारणा केली जाणार आहे. प्रशासनिक कार्यप्रवाह अधिक सुव्यवस्थित करण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयोगी ठरेल. दस्तऐवज व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी स्वयंचलित संक्षेपण व विश्लेषणाची सुविधा उपलब्ध होईल. तसेच, नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने जलद निराकरण शक्य होणार आहे. आरोग्य व्यवस्थापन, जमीन अभिलेख व्यवस्थापन आणि वाहतूक व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये कोपायलट तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावेल. वाहतूक दंडाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी ते आधार कार्ड व अन्य आवश्यक सेवांशी थेट जोडण्यात येईल. यामुळे शासनाच्या सेवा अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकांच्या हिताच्या बनतील.

**सामंजस्य कराराचे प्रमुख फायदे** – प्रशासनिक कार्यक्षमता वाढवेल : ‘ए.आय.’ तंत्रज्ञानाच्या मदतीने दस्तऐवजांचे स्वयंचलित विश्लेषण आणि प्रक्रिया जलद होईल. शासनाचे निर्णय अधिक अचूक आणि डेटा-आधारित होतील. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी कार्यप्रवाह सोपा आणि सुव्यवस्थित होईल.

**कर्मचाऱ्यांचे कौशल्यवर्धन आणि रोजगाराच्या संधी :** मायक्रोसॉफ्टच्या चड ङशरीप प्लॅटफॉर्मद्वारे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त अख प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र मिळेल. सरकारी कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढेल. नवीन तंत्रज्ञानामुळे महाराष्ट्रातील खढ आणि अख क्षेत्रात अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

**नागरिकांना जलद आणि प्रभावी सेवा मिळणार :** Coilot तंत्रज्ञानामुळे नागरिकांच्या तक्रारी आणि प्रश्नांना तत्काळ उत्तर मिळेल. हेल्थकेअर, शिक्षण, वाहतूक आणि जमीन अभिलेख व्यवस्थापन यांसारख्या सेवा अधिक जलद आणि प्रभावी बनतील. नागरी सुविधांमध्ये पारदर्शकता वाढेल आणि भ्रष्टाचाराला आळा बसेल.

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने धोरणात्मक सुधारणा :** कृषी, आरोग्य, सायबर सुरक्षा आणि औद्योगिक विकास यासारख्या क्षेत्रांमध्ये एआय आधारित घोरणे तयार करता येतील. वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी दंड प्रणालीला डिजिटल सेवांशी थेट जोडता येईल, ज्यामुळे शिस्तबद्ध वाहतूक प्रणाली निर्माण होईल. शासनाच्या विविध यंत्रणांमध्ये ‘एआय’चा समावेश झाल्यामुळे महाराष्ट्र डिजिटल प्रशासनाच्या दिशेने देशात अग्रेसर राहील.

# पोलिसाच्याच घरी झाली चोरी, २१ तोळे सोन्यासह रोकड चोरट्यांनी केली लंपास

सोलापूर : अज्ञात चोरट्याने पोलिसाचे घर फोडून २१ तोळे सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम, पोलिस गणवेश असा ८ लाख ६८ हजार रुपयांचा ऐवज आणि शेजाऱ्याच्या घरातील ४० हजारांची रोकड असा एकूण नऊ लाखांचा ऐवज चोरून धूम ठोकली. मळेगाव (ता. बार्शी) येथे हा प्रकार घडला. या प्रकरणी पोलिस सेवेत असलेल्या संताजी अलाट यांच्या आई भागिरथी मधुकर अलाट यांनी पांगरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्याने गुन्हा नोंदला आहे. फिर्याद दाखल होताच ताफ्यासह ठसे तज्ज्ञ, श्वानपथकास पाचारण केले होते. श्वान घरापासून पाचशे मीटर अंतरावर जाऊन घुटमळत राहिले. फिर्यादीत म्हटले आहे की, मळेगाव येथील घरी रात्रीच्या नऊ वाजता फिर्यादीसह सर्वजण जेवण आटोपून झोपले होते.



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पँथर प्रणित विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती समितीच्या वतीने नवीन उद्योजकांचे फुलंब्री तालुक्यात सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण भुतकर , जयंती अध्यक्ष धम्मपाल दांडगे , भीमराव गाडेकर ,अशोक मिसाळ यांनी उद्योजक आणिल साठे ,भाऊसाहेब नवले, कैलाश जुमडे यासह नवीन उद्योजकांचा सत्कार करण्यात आला दररोज विविध कार्यक्रम समितीच्या वतीने घेण्याचा संकल्प केला आहे

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**